संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
0 3 NOV 2025
प्राप्त झाले सही.....................

प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री.नवनाथ भिकाजी बंडगर, लेखाधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
**शासन आदेश:-संलेको-२०२५/प्र.क्र.३३/कोषा प्रशा -२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ३१.१०.२०२५.

**संदर्भ**:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/श्री. बंडगर/११.२४/१४०२/१०६६/४६८७, दि.१३.११.२०२४,
२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे आदेश क्र.मकृखोविम/०८/४७७/२०१६/आ.७/३३६, दि.०५.१०.२०२०,
३) संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय यांचे आदेश क्र. सेलेको/प्रशा-राप/स.ब.२०२०/५३४/दि.१०.०८.२०२०,
४) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे आदेश क्र.मकृखोविम/०८/४०७/२०१६/आ.७/२४६३, दि.१३.०८.२०२०,
५) कार्यालयीन अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचे पत्र क्र.ससरु/वै.मंडळ/३१६/२०२३,दि.२५.०३.२०२३,
६) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/प्रतिक्षाधीन/का.६/०१.२३/६६/४३/२५४,दि.११.०४.२०२३,
७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/प्रतिक्षाधीन/०४/२०२३/७००, दि.१२.०४.२०२३,
८) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.२०४/कोषा प्रशा-२,दि.१९.१०.२०२३,
९) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/कार्यमुक्त-श्री.बंडगर/१०/२०२३/२१२५, दि.२६.१०.२०२३,
१०) संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्रा जा.क्र.रा.व्य.पं.रा./कावि/रुजू अहवाल/११२३/२०२३, दि.३०.१०.२०२३,
११) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.२०४/कोषा प्रशा-२,दि.३१.१०.२०२५.

4

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील श्री. नवनाथ भिकाजी बंडगर, लेखा अधिकारी हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे येथे कार्यरत असतांना ब्रेन स्ट्रोक व पॅरालिसीसमुळे (पक्षाघात/अर्धांगवायू) त्यांना दि.२८.०६.२०२० रोजी रुबी हॉल क्लिनीक, पुणे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असल्याचे संदर्भ क्र. १, दि.१३.११.२०२४ रोजीच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

२. श्री. बंडगर यांनी दि.२९.०६.२०२० ते दि.१२.०८.२०२० या कालावधीत उपभोगलेली ४५ दिवसांची अर्जित रजा (वैद्यकीय कारणास्तव) विशेष अधिक्षक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे संदर्भ क्र.२, दि.०५.१०.२०२० रोजीचे आदेशान्वये मंजूर करण्यात आली आहे.

३. संचालनालय लेखा व कोषागारे यांचे संदर्भ क्र.३, दि.१०.०८.२०२२ च्या आदेशान्वये श्री. बंडगर यांची प्रशासकीय कारणास्तव महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयात लेखा अधिकारी पदावर बदली करण्यात आली. त्याअनुषंगाने श्री. बंडगर यांना सदर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे संदर्भ क्र.४ अन्वये दि.१३.०८.२०२० (म.पू.) पासून कार्यमुक्त करण्यात आले.

रसुलेको
३/११/२५

D:\gaurav dande\सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी\२०२५\श्री. बंडगर.docx

01345/2025/1920
04.11.2025

४. श्री. बंडगर हे वैद्यकीय कारणास्तव पदस्थापनेच्या पदावर हजर झाले नसून त्यांनी दि.१३.०८.२०२० ते दि.११.०४.२०२३ या कालावधीत वैद्यकीय कारणास्तव (ब्रेन स्ट्रोक व पॅरालिसिसमुळे) एकुण ९७२ दिवस रजा उपभोगली आहे.

५. संदर्भ क्र.५ ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील स्थायी वैद्यकीय मंडळाने दिलेल्या अहवालानुसार श्री. बंडगर यांना शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथे त्वरीत रुजू होण्याबाबत संदर्भ क्र.६, दि.११.०४.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार श्री. बंडगर हे संदर्भ क्र.७ अन्वये दि.१२.०४.२०२३ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे येथे हजर झाले.

६. संदर्भ क्र.८, शासन आदेश दि.१९.१०.२०२३ अन्वये श्री. बंडगर यांना लेखा अधिकारी, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान, पुणे या पदावर पदस्थापना देण्यात आली.

७. श्री. बंडगर यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयातून दि.२६.१०.२०२३ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले असुन संदर्भ क्र.१० अन्वये श्री.बंडगर हे संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयात पदस्थापनेच्या पदावर दि.२७.१०.२०२३ (म.पू.) रोजी हजर झाले.

८. श्री. बंडगर, लेखाधिकारी यांची दि.१३.०८.२०२० ते दि.११.०४.२०२३ या कालावधीतील ९७२ दिवसांची रजा संदर्भ क्र.११, दि.३१.१०.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली आहे.

९. सबब, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींनुसार श्री. नवनाथ भिकाजी बंडगर, लेखा अधिकारी यांचा खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिक्षाधीन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे :

| अ.क्र. | कालावधी | दिवस | नियमित करावयाचा प्रतिक्षाधिन कालावधी |
|---|---|---|---|
| १ | दि.१२.०४.२०२३ ते दि.२६.१०.२०२३ | १९८ दिवस | जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे येथे कार्यरत. |

१०. यास्तव, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लेखाधिकारी संवर्गातील श्री.बंडगर यांच्या दि.१३.०८.२०२० ते दि.११.०४.२०२३ या ९७२ दिवस मंजूर रजा कालावधीचे (साप्ताहिक सुट्ट्यांसह) व लगतनंतर दि.१२.०४.२०२३ ते दि.२६.१०.२०२३ पर्यंत १९८ दिवस नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे,*
५) श्री.नवनाथ भिकाजी बंडगर, लेखाधिकारी *
६) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)